# श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती
## समाजशास्त्र विभाग
## सत्र २०१७-२०२२

# अहवाल

**१) रोजगाराच्या संधी आणि समाजशास्त्राची भूमिका :-**

श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती येथे दिनांक ४/९/२०१७ रोजी समाजशास्त्र विभागाद्वारे ''रोजगाराच्या संधी आणि समाजशास्त्राची भूमिका'' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानाचे प्रमुख वक्ते म्हणून प्रा.डॉ.किशोर गजभिये समाजशास्त्र विभाग, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती हे उपस्थित होते. प्रा.डॉ.किशोर राऊत यांनी आज दिवसेंदिवस समाजशास्त्र विषयाची व्याप्ती विस्तृत होत आहे. समाजशास्त्राच्या विविध शाखेद्वारे जीवनाचे विविध अंगाचे वैज्ञानिकदृष्टीने अध्ययन केले जाते त्यामुळे समाजशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांना आज विविध क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध होवू शकतात. समाजशास्त्रात संपूर्ण समाजजीवनाचे सांगोपांग सूक्ष्मरितीने अध्ययन होत असल्याने अनेक समाजशास्त्राच्या शाखा उदयास आलेल्या आहेत. समाजशास्त्र हा विषय महाविद्यालयात शिकविला जाणारा विषय आहे. तर समाजशास्त्र हा विषय व्यवसायाभिमूख शास्त्र झालेला आहे. समाजशास्त्र हे उपयोजित शास्त्र आहे. समाजजीवन जगत असतांना दैनंदिन जीवनात किंवा व्यवहारात समाजशास्त्राचा उपयोग होवू लागलेला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना भविष्यात हा शास्त्र उपयोगी पडणार आहे आणि आपल्यासाठी अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत असे व्याख्यानाप्रसंगी मत व्यक्त केले.

प्रा.डॉ. आनंद बनकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करून दिला तर कार्यक्रमाचे आभार प्रा.डॉ.ज्ञानेश्वर नामूर्ते यांनी केले. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख उपस्थित होत्या. प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली सदर व्याख्यान घेण्यात आले.

**२) बुवाबाजी आणि अंधश्रद्धा :-**

दि.५/१२/२०१८ रोजी समाजशास्त्र विभाग व रा.से.यो. विभागाच्या वतीने ''बुवाबाजी आणि अंधश्रद्धा'' या विषयावर प्रबोधनात्मक व्याख्यान करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.स्मिता देशमुख उपस्थित होत्या. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्रीमती उषा शाह सोलापूर (महाराष्ट्र अंधश्रद्धा समिती) तसेच श्री.गजेंद्र सुरकार (राज्य सरचिटणीस, महाराष्ट्र अंधश्रद्धा समिती) हे होते. याशिवाय समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ.ए. एल. बनकर, प्रा.डॉ.वाय.सी. मेंढे (रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी), डॉ.ज्ञानेश्वर नामूर्ते, डॉ.सुजाता सबाने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना श्रीमती उषा शाह यांनी आज समाजात महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात अंधश्रद्धेचे प्रमाण जास्त आहे. आज आपण वैज्ञानिक व तंत्रज्ञानात्मक युगात वावरत असलो तरी आपले संपर्ण जीवन अंधश्रद्धेने व्यापलेले आहे. आज उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे व साक्षर लोकांचे प्रमाण जरी वाढले असले तरी संपूर्ण समाज अंधश्रद्धेचे विळख्यात सापडलेला आहे. म्हणून विद्यार्थ्यांनी आज वैज्ञानिक विचार व मानवतावादी विचार आत्मसात केले पाहीजे. इतकेच नव्हे तर वैज्ञानिक विचारसरणीनुसार आपले आचरण असले पाहीजे. समाजात जे संधीसाधू, महाराज, संत, बाबा यापासून विद्यार्थ्यांनी दूर असले पाहीजे. कारण संधीसाधू, महाराज, संत, बाबा हे समाजाला अंधश्रद्धेच्या विळख्यात आपल्याला ओढून घेतात आणि आपल्यावर अन्याय, अत्याचार, शोषण करतात. अनेक उदाहरणे समाजात याबाबत घडले आहे. म्हणून विद्यार्थ्यांनी डोळस असले पाहीजे. वेळीच संधीसाधू, बाबा, महाराज यांना ओळखले पाहीजे व आपले संरक्षण केले पाहीजे. असे मत प्रमुख मार्गदर्शन करताना सांगितले आहे.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.वाय.सी. मेंढे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार डॉ.ज्ञानेश्वर नामूर्ते यांनी केले. सदर कार्यक्रमाला महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

**३) जागतिक आरोग्य दिनानिमित्त व्याख्यान :– (दि.७/४/२०२२)**

श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती येथील समाजशास्त्र व गृहअर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात जागतिक व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. आयोजन करण्यामागील उद्देश सर्व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना धापवळीच्या जीवनात आरोग्याचे महत्त्व कळावे, त्यांनी आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी तसेच स्वतःला जपावे या उद्देशाने विद्यार्थ्यांचे उद्‌बोधन व्हावे या हेतूने समाजशास्त्र व गृहअर्थशास्त्र विभागाद्वारे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कारण प्रत्येक स्त्री–पुरूष हे समाजजीवनाचे अविभाज्य अंग आहे. प्रत्येक घटक सुदृढ, निकोप, निरोगी असला पाहीजे. व्यक्ती ही निकोप, निरोगी व सुदृढ असले की पर्यायाने समाज निरोगी राहतो. सामाजिक आरोग्य हे चांगले राहते आणि प्रत्येक घटकाला दिर्घायुष्य लाभते. त्यात समाजाची हानी न होता समाजाचा विकास, प्रगती होत असतो. यासर्व गोष्टींची विद्यार्थ्यांना जाणीव व्हावी व माहिती व्हावी म्हणून आरोग्य दिनानिमित्त आरोग्याच्या संदर्भात दोन वेगवेगळ्या विषयावर प्रसिद्ध वक्ते बोलावून विद्यार्थ्यांचे उद्‌बोधन करण्यात आले. व्याख्यानाचे प्रमुख अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रामेश्वर भिसे उपस्थित होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रत्येक विद्यार्थ्यांनी नियमित व्यायाम, चालणे, धावणे, योगा करणे ही काळाची गरज आहे. त्याशिवाय दिर्घ आयुष्य लाभू शकत नाही. तसेच कोणतेही काम करताना थकवा जाणवत नाही उलट अनेक प्रकारची उर्जा मिळते असे मत मांडले.

सदर व्याख्यानमाला प्रमुख वक्ते म्हणून डॉ.जागृती शहा स्त्रीरोगतज्ञ उपस्थित होत्या. त्यांच्या व्याख्यानाचा विषय ''हाई रिस्क प्रिगनन्सी अँड फर्टिलिटी'' हा होता. या विषयावर मत व्यक्त करताना डॉ.शहा यांनी आरोग्य हे मानसिक, शारीरिक व आध्यात्मिक घटकांचे अद्वितीय संघटन असून प्रत्येक मुलामुलींनी मानसिकदृष्ट्या, शारीरिकदृष्ट्या व आध्यात्मिकदृष्ट्या सक्षम असले पाहीजे. तेव्हाच आपले आरोग्य निकोप व सुदृढ असू शकते. मुलामुलींनी आपल्या सगळ्यांची खूप काळजी घेतली पाहीजे. उशिरा लग्न केले तर विशेषत्वाने मुलींमध्ये वंध्यत्वाची समस्या कशी मोठ्या प्रमाणात निर्माण होते, गर्भधारणा, मासिकपाळी या गोष्टींवर प्रकर्षाने प्रकाश टाकण्याचा प्रयत्न डॉ.जागृती शहा यांनी केला.

त्याशिवाय डॉ.लक्ष्मी भोंड बालरोगतज्ञ यांनी ''निरोगी स्त्री निरोगी कुटुंब'' या विषयावर आजच्या धावपळीच्या जीवनात विशेषतः तरूण मुलामुलींनी नियमित सराव, व्यायाम, खानपान या गोष्टींकडे विशेषत्वाने लक्ष दिले पाहीजे. पूर्वीच्या स्त्रियांचे जीवनमान, खानपान, विविध प्रकारचे काम आणिआजच्या स्त्रियांचे जीवनमान, खानपान, विविध प्रकारचे कामे यात खुप अंतर आहे. पूर्वी स्त्रिया कष्टाचे कामे करून सुद्धा सुदृढ, निकोप, निरोगी असायच्या परंतु आजच्या सत्रीला वेळेअभावी किंवा कामाची सवय नसल्याने निरोगी शरीर राहू शकत नाही. परिणामी स्त्रियांचे आरोग्य बिघडते व शेवटी दवाखान्याच्या चकरा माराव्या लागतात. जर स्त्री निरोगी असेल तर कुटुंब निरोगी राहते. परिणामी आरोग्य सुद्धा चांगले राहून समाज विकासाच्या दिशेने पाऊल टाकू शकतो. निरोगी शरीर हे समाजाच्या विकासात व प्रगतीमध्ये हातभार लावते असे मत व्यक्त केले.

**४) सामाजिकशास्त्रातील नवे प्रवाह व करिअरच्या संधी :– दि.११/४/२०२२**

श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती येथे समाजशास्त्र विभाग व करिअर कॉन्सीलिंग सेलच्या संयुक्त विद्यमाने ''सामाजिक शास्त्रातील नवे प्रवाह व करिअरच्या संधी'' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

सदर व्याख्यानाचे अध्यक्ष महाविद्यालयचे प्राचार्य डॉ.रामेश्वर भिसे हे होते तर वक्ते म्हणून महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी हर्षल चव्हाण उपस्थित होते. हर्षल चव्हाण हा महाविद्यालयाचा माजी होतकरू विद्यार्थी असून सध्या पब्लिक पॉलिसी अँड गव्हर्रनंस या विषयात मास्टर डिग्रीचे शिक्षण टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्स, हैद्राबाद येथे घेत आहे. शिक्षण घेत असतांना प्रत्येक विद्यार्थ्याने मनात जिज्ञासा घेवून नवनवीन गोष्टी आत्मसात केले पाहीजे. इंग्रजी हा विषय कठीण असला तरी त्याचा मोठा बाऊ न करता किंवा न घाबरता नेहमी सराव केले तर इंग्रजी या विषयाची

भिती नाहीशी होते व पुढील उच्च शिक्षणाची दारे आपोआप खुले होतात. परंतु विद्यार्थ्यांनी प्रथम आपले ध्येय, उद्देश निश्चित करायला पाहीजे. सामाजिकशास्त्र हे सुद्धा नैसर्गिकशास्त्र व व्यावसायिक शास्त्र जसे मेडिकल, इंजिनिअरिंग या शास्त्रासारखेच खुपच महत्त्वाचे आहे. आज सामाजिकशास्त्रामध्ये एम.ए. असेल तर २०० पेक्षा जास्त विषयात विद्यार्थ्यांना एम.ए., एम.फिल., पी.एचडी. करता येईल. तसेच अनेक फेलोशिप सुद्धा प्राप्त करता येईल. ज्या विद्यार्थ्यांना पारंपारिक विषयाव्यतिरिक्त अनेक विषयात एम.ए. अजिस, प्रेमजी युनिर्व्हसिटी, जे.एन.यू. टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशन सायन्स या सारख्या नामवंत व आशियातील प्रसिद्ध विद्यापीठात विद्यार्थ्यांना हे करण्याची संधी आहे. म्हणून त्यादृष्टीने आज प्रत्येक विद्यार्थ्यांनी प्रचार–प्रसार साधनांचा उपयोग करून नवीन अभ्यासक्रमांचा शोध घेतलापाहीले व पूर्व परीक्षेची तयारी केली पाहीले. पूर्व परीक्षेची तयारी करावी वाटल्यास त्यासंदर्भात योग्य ते मार्गदर्शन तसेच प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष मदत मी या शिवाजी महाविद्यालयाचा विद्यार्थी या नात्याने करायला तयार आहे असे हर्षल चव्हाण यांनी मत मांडले.

आजचे युग स्पर्धेचे युग आहे. स्पर्धा ही सर्वच क्षेत्रात आपल्याला दिसून येते. परंतु प्रत्येकाला जॉब मिळेल अशी शाश्वती नाही. परंतु आपण खचून न जाता मोठ्या आत्मविश्वासाने अभ्यास करून स्वतःला घडविले पाहीजे. विद्यार्थ्यांनी आपला अमूल्य वेळ इतरत्र न घालवता अभ्यासावर लक्ष केंद्रित करून आपण उज्वल भविष्य घडविले पाहीजे असेही उद्‌बोधन व्याख्यान याप्रसंगी हर्षल चव्हाण यांनी केले.

अध्यक्षीय भाषण करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रामेश्वर भिसे यांनी हर्षल चव्हाणचे शाल–श्रीफळ देवून गोरव करून येथोचित कौतुक केले. कार्यक्रमाचे आयोजन व प्रास्ताविक भाषण डॉ.ज्ञानेश्वर नामूर्ते यांनी केले. आभार करिअर कॉन्सीलिंग सेलचे संयोजक डॉ.अपर्णा सरोदे यांनी मानले. संचालन समर्थ ढोबळे यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

The Head
Department of Sociology
Shri Shivaji Arts & Commerce College,
AMRAVATI.

# अहवाल

## समाजशास्त्र विभाग

## विशेष व्याख्यान अहवाल

**दिनांक:- 07/12/2020**

श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागाव्दारे ऑनलाईल विशेष व्याख्यानाचे आयोजन दि. 07.12.2020 रोजी दुपारी 12.00 वा. करण्यात आले. व्याख्यानाचा विषय **"भारतातील स्थलांतरीत कामगारांचे प्रश्न व आव्हाने"** ह्या होता. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख हया उपस्थित होत्या. व्याख्यानाचे प्रमुख वक्ते प्रा. डॉ. राहूल भगत समाजशास्त्र विभाग प्रमुख, एस. एन. मोर कॉलेज ऑफ आर्टस आणि श्रीमती गोदावरीदेवी सराफ सायन्स कॉलेज, तुमसर, जि. भंडारा हे हजर होते. प्रा. डॉ. राहूल भगत यांनी मार्गदर्शन करतांना स्थालांतर हा विषय व्यापक स्वरुपाचा म्हणजेच वैश्विक स्वरुपाचा आहे. सध्या संपूर्ण जगावर कोरोनाचे सावट पसरले आहे. त्यामुळे संपूर्ण जगातील समाज जीवन प्रभावित झालेले असून या महामारीचा प्रभाव सर्वच क्षेत्रावर पडलेला दिसून येत आहे. त्यापैकी सर्वाधिक प्रभाव संघटीत व असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या कामागारावर झाल्याचे दिसून आले. भारतात लॉकडाऊन काळात स्थलांतरीत मजुरापुढे पोटापाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. त्या कालावधीत हाताला काम नव्हते. त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची पाळी निर्माण झाली होती. काम, रोजगार नसल्यामुळे गावाकडे जाण्याची ओढ त्यांच्यात निर्माण झाली होती. तेव्हा हजारो कि.मी. पायपीट करुन पायी-पायी गावाकडे जाण्यासाठी जथेच्या जथे निघाले होते. तेव्हामात्र अनेक संकटे त्यांच्यापुढे निर्माण झाली होती. अनेक स्थलांतरीत मजुरांचा अपघात झालाव काही त्यात मृत्युमुखी देखील पडले.

कामगाराचे देशाच्या अर्थव्यवस्थेत फार मोठे योगदान आहे परंतू स्थलांतर करतांना सरकार सुध्दा त्यांच्या पाठीशी नव्हते. अशा स्थलांतरीत कामगाराचे जीवनमान उंचाविण्यासाठी शासकीय पातळीवर प्रयत्न होणे गरजेचे आहे. स्थलांतरला सामाजिक, सांस्कृतिक व आर्थीक संदर्भ असतात म्हणून स्थलांतरीत कामगारांच्या हालपेष्टा, त्यांचे प्रश्न समजुन घेणे काळाची गरज आहे, असे डॉ. राहूल भगत यांनी व्याख्यान प्रसंगी मत मांडले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य स्मिता देशमुख यांनी अध्यक्षीय भाषणातून भारतातील स्थलांतरीत कामगारांचा प्रश्न अत्यंत ज्वलंत, गंभीर स्वरुपाचा आहे. स्थलांतर हा मर्यादीत विषय नसून आंतरराष्ट्रीय स्वरुपाचा आहे. स्थलांतरीत प्रश्नाची दाहकता आपण समजून घेतली पाहिजे. समाजशास्त्राच्या विद्यार्थी प्राध्यापक यांनी या विषयाकडे संशोधक वृत्तीने पाहून सखोल व चिकीत्सक रितीने या विषयाचे आपण अध्ययन केले पाहीजे, अशी प्रेरणात्मक मार्गदर्शन केले.

सदर विशेष व्याख्यान आयोजन करण्याकरीता आय.क्यु.ए.सी. संचालक डॉ. महेद्र मेटेसर यांचो प्रेरणा व मार्गदर्शन लाभले. या व्याख्यानाचे प्रास्ताविक व परिचर करुन देण्याचे काम समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. ज्ञानेश्वर नामुर्ते यांनी केले तर व्याख्यानाचे आभार डॉ. जयराम गायकवाड यांनी केले. या विशेष व्याख्यानाला 60 प्राध्यापक व विद्यार्थी सहभागी झाले होते.

**डॉ. ज्ञानेश्वर नामुर्ते,**
**समाजशास्त्र विभाग प्रमुख**
**श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय,**
**अमरावती.**